## नियमावली

१. स्पर्धकाचे वय २५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.
२. स्पर्धकांनी आपल्या महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत आणावे.
३. गतविजेत्या (प्रथम पारितोषिक प्राप्त) स्पर्धकांना स्पर्धेच्या त्या विभागात पुन्हा सहभागी होता येणार नाही.
४. वक्तृत्त्व स्पर्धेसाठी दोन वेगळ्या विषयावर बोलणाऱ्या स्पर्धकांचा संघ पाठवावा. संघासाठी प्रवेश शुल्क रू.२००/- राहील.
५. वाद-विवाद स्पर्धेतील संघात अनुकूल व प्रतिकूल बाजू मांडणाऱ्या दोन स्पर्धकांचा समावेश बंधनकारक राहील. तरच ते वैयक्तिक किंवा सांघिक पारितोषिकासाठी पात्र राहतील. संघासाठी प्रवेश शुल्क रू. २००/- राहील.
६. स्पर्धकास एकूण १० मिनिटे (८+२) वेळ देण्यात येईल.
७. संयोजन समितीने निश्चित केलेल्या क्रमांकानेच स्पर्धकांना भाषण करावे लागेल.
८. स्पर्धकांना प्रवेश अर्जात नमूद केलेले विषय ऐनवेळी बदलता येणार नाहीत.
९. सर्व स्पर्धांबाबत संयोजन समितीचा निर्णय अंतिम राहील.
१०.वक्तृत्त्व किंवा वाद-विवाद स्पर्धेत सहभागी स्पर्धकांनाच उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेत भाग घेता येईल व त्यासाठी स्वतंत्र प्रवेश शुल्क रू. ५०/- राहील.
११. स्पर्धकाने आपले ऑनलाईन रजिस्ट्रेशन करावे त्यासाठी स्वतंत्र वेबसाईट लिंक दिलेली आहे. त्याचा वापर करावा.
* स्पर्धकांची निवास व भोजनाची व्यवस्था संयोजकांतर्फे निःशुल्क केलेली आहे.

## सहभाग पत्र

आपल्या संघाच्या सहभागाचे प्राचार्यांच्या सहीचे पत्र सोमवार, दिनांक १ ऑक्टोबर २०१८ पर्यंत पाठवावे.

**टीप :** सर्व सहभागी संघांनी नोंद घ्यावी की, विजेत्या स्पर्धकांना फिरत्या ढाली त्यांच्या महाविद्यालयाला सुपूर्त कराव्या लागतील व त्यासाठी अनामत रक्कम प्रत्येकी रू. २०००/- जमा करावी लागेल. ढाली नेणे व वेळेवर परत करण्याची जबाबदारी सर्वस्वी त्या महाविद्यालयाची राहील व तसे हमीपत्र द्यावे लागेल.

बुक-पोस्ट

सस्नेह निमंत्रण

प्रति, ------------------------------

------------------------------

------------------------------


प्रेषक

**मा. प्राचार्य**

तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
बारामती, ता. बारामती - ४१३ १०२, जि. पुणे.
फोन : ०२११२-२२२४०५ फॅक्स : ०२११२-२२२७२८
E-Mail : principal.tccollege@gmail.com
Website : www.tccollege.org/moropant


उत्तुंग क्षमताशील महाविद्यालय
स्थापना : २३ जून १९६२

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती जि. पुणे

• नॅक पुनर्मूल्यांकन 'ए+' (सीजीपीए ३.५५) २०१७ •
• उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार २०१७ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ •
• उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार २०१७ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ •
• उच्च क्षमताशील महाविद्यालय २०१६ यू.जी.सी., नवी दिल्ली •
• उत्कृष्ट एन.एस.एस. पुरस्कार २०१६ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ •
• स्टार महाविद्यालय योजना २०१६ डी.बी.टी. •
• फिस्ट योजना २०१३ डी.एस.टी. •

आणि

# बारामती नगर परिषद, बारामती

द्वारा आयोजित

# कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्त्व व वादविवाद स्पर्धा २०१८

शुक्रवार, दि.५/१०/२०१८ शनिवार, दि.६/१०/२०१८



वर्ष ४६ वे

**प्रा. सुशील देशमुख**
कार्याध्यक्ष
भ्रमणभाष : ८६६९८४०८८०

**डॉ. चंद्रशेखर मुरुमकर**
प्राचार्य



# कविवर्य मोरोपंत

## वक्तृत्त्व व वाद-विवाद स्पर्धेचे काही यशस्वी मानकरी

- ✻ श्री. अविनाश धर्माधिकारी
- ✻ डॉ. अरूणा ढेरे
- ✻ श्री. समीरण वाळवेकर
- ✻ श्री. अभिराम भडकमकर
- ✻ श्री. परेश मोकाशी
- ✻ व इतर अनेक नामांकित

## वक्तृत्त्व स्पर्धा

### कनिष्ठ महाविद्यालय

शुक्रवार, दि. ५ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ९ वाजता

**विषय**

१. मोरोपंतांच्या काव्यातील जीवनमूल्ये
२. भ. महावीरांच्या विचारांचे महत्त्व
३. आजचा युवक : क्या खोया क्या पाया...
४. नवा आजार : सेल्फी मॅनिया
५. केशवकुमारांची 'झेंडूची फुले'
६. ये दिल माँगे मोअर...

### वरिष्ठ महाविद्यालय

शुक्रवार, दि.५ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता

**विषय**

१. कविवर्य मोरोपंतांच्या रामकथांमधील आगळेपण
२. भारतीय विचारसरणीत जैन तत्वज्ञानाचे योगदान
३. नारी बिना हर बदलाव अधूरा हैं ।
४. अनुदानाच्या अर्थकारणाचे राजकारण
५. आचार्य अत्रे यांच्या साहित्यातील पुरोगामी विचार
६. कोटींच्या वृक्ष लागवडींचा रूक्ष महाराष्ट्र
७. ब्रेकिंग न्यूजचा जमाना
८. बाबुजी : एक भावप्रवास

## वाद-विवाद स्पर्धा

शनिवार, दि.६ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ९.०० वाजता

**प्रस्ताव**

**"लोकशाहीची व्याख्या बदलली जात आहे."**

## उत्स्फूर्त वक्तृत्त्व स्पर्धा

शनिवार, दि.६ ऑक्टोबर २०१८ रोजी सायं. ४.०० वाजता.

## पारितोषिक वितरण समारंभ

शनिवार, दि.६ ऑक्टोबर २०१८ रोजी सायं. ५.३० वाजता.



## कविवर्य मोरोपंत

पेशव्यांचे सावकार श्रीमंत बाबूजी नाईक यांच्याकडे असलेल्या नवरत्नांपैकी एक रत्न म्हणजे कविवर्य मोरोपंत. अफाट प्रतिभेचे पंडित कवी म्हणून त्यांची ख्याती आहे. शब्दावर कमालीचे प्रभुत्व असलेले मोरोपंत हे मराठी साहित्याला लाभलेले लेणे आहे. त्यांनी ७५ हजाराहून अधिक आर्यांची निर्मिती केलेली आहे. बारामतीत त्यांचे सर्वाधिक वास्तव्य होते. कविवर्य मोरोपंतांची बारामती म्हणून बारामती नगरीचा वेगळा लौकिक आहे. पूर्वीची 'भीमथडी' व आताची 'बारामती', मोरोपंतांच्या कार्यकर्तृत्वाने विश्वप्रसिध्द आहे.

बारामतीच्या नावलौकिकात मोलाची भर घालणाऱ्या या महान व्यक्तीचे स्मरण व्हावे या हेतूने १९७२-७३ साली बारामती नगरपरिषदेने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या सहकार्याने पुढाकार घेऊन वाद-विवाद व वक्तृत्त्व स्पर्धा सुरू केल्या. २०१८ हे या स्पर्धेचे ४६ वे वर्ष आहे. आजवर या स्पर्धांचे उत्कृष्ट आयोजन तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय करीत आले आहे. या स्पर्धेने अनेक उत्कृष्ट वक्ते महाराष्ट्राला दिलेले आहेत. कविवर्य मोरोपंतांच्या नावे चालत असलेल्या या स्पर्धेचा दर्जा सर्वोत्तम असल्याने या स्पर्धेत सहभागी होणे व स्पर्धा जिंकणे हे अनेक युवकांचे ध्येय असते.

## पारितोषिके

१. वक्तृत्त्व व वाद-विवाद स्पर्धांसाठी दोन स्वतंत्र फिरत्या ढाली.
२. मोरोपंतांच्या विषयावर प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकास विशेष पारितोषिक व स्वतंत्र फिरती ढाल.
३. उत्स्फूर्त वक्तृत्त्व स्पर्धेसाठी स्वतंत्र फिरती ढाल.
४. मान्यवरांनी विविध विषयावर जाहीर केलेली अनेक वैयक्तिक रोख बक्षीसे.